T no 134
8/1/19

वाचले – १) माध्यमिक विद्यालय काळभोरनगर यांचेकडील पत्र क्र.३८२/२०१८ दि.०५/१२/२०१८

२) माध्यमिक विद्यालय काळभोरनगर यांचेकडील पत्र क्र.३८३/२०१८ दि.०६/१२/२०१८

३) माध्य/शि/०१/कावि/११८३/२०१८ दि.१८/१२/२०१८ चे कारणे दाखवा नोटीस.

४) श्री.तुपे राजेंद्र पुंजाहरी सहा.शिक्षक यांचा दि.१९/१२/२०१८ चा खुलासा

५) दि. ०७/०१/२०१९ चा मा.शिक्षणाधिकारी यांचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
माध्यमिक शिक्षण विभाग
माध्य/शि/०१/कावि/२३ /२०१९
दिनांक - ०७/०१/२०१९

विषय – दंडात्मक शास्ती करणेबाबत...

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालय काळभोरनगर या ठिकाणी कार्यरत असलेले सहाय्यक शिक्षक श्री.राजेंद्र पुंजाहरी तुपे यांना उपरोक्त संदर्भ क्र.०२ अन्वये विद्यालयाने गैरवर्तनाबाबत पत्र बजावणेत आलेले होते. सदर पत्र श्री.तुपे यांनी फाडुन कच-यात टाकले व त्या पत्राची स्वाक्षरी पोहोच देणेबाबत नकार दिला,त्याबाबत अरेरावीची भाषा करून कार्यालयातुन निघुन गेले.

श्री.तुपे सहा.शिक्षक हे वांरवार कामकाजात टाळाटाळ करतात असे निर्दशनास आलेले आहे. तसेच त्यांना कामकाज नेमुन दिलेल्या वर्गावर न जाता मुलांना मैदानावर खेळायला सोडतात व त्या संदर्भात मुख्याध्यापक यांनी विचारणा केली असता त्यांना दुरूत्तरे केली व मोठ्या आवाजात आरडा ओरडा करतात सदरची वर्तणुक ही अत्यंत लज्जास्पद व कार्यालयीन शिस्तीचा भंग करणारी आहे. तसेच श्री.तुपे यांचे एका महिला अधिका-याशी असे वागणे हे अशोभनीय आहे.याबाबत तुपे यांना वाचले क्र.०३ अन्वये कारणे दाखवा नोटीस देणेत आलेली होती.सदर नोटीसचा खुलासा तुपे यांनी वाचले क्र.०४ अन्वये सादर करणेत आलेला असुन सदर खुलासा अमान्य करणेत आलेला आहे.

सबब मी शिक्षणाधिकारी माध्यमिक शिक्षण विभाग मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून श्री.राजेंद्र पुंजाहरी तुपे (सहा.शिक्षक) माध्यमिक विद्यालय काळभोरनगर यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,कलम ५६(२) "ड" अन्वये रक्म रूपये २५/- (अक्षरी रक्कम रू.पंचवीस फक्त ) दंड करणेस व सदर दंडाची रक्कम लगतच्या वेतनातुन वसूल करून त्याची नोंद सेवानोंद पुस्तकात नोंद घेणेस सदरचे आदेशान्वये मान्यता देत आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माध्यमिक शिक्षण विभाग
| | |
|---|---|
| तारीख | 9/1/2019 |
| आवक क्र | 152 |
| लिपिकाचे नांव | |
| व लिपिक | |
| कार्या अधि | |
| मा शिक्षणा-धिकारी | |
| मा अति आयुक्त | |

अति.आयुक्त कार्यालय
आवक क्र. 90
दिनांक 8/1/19
विभाग माध्यमिक
लिपिक-
व.लिपिक-
स्वीय सहा.-
मा.अति.आयुक्त-

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८.

प्रति,

१) श्री.राजेंद्र पुंजाहरी तुपे (सहा.शिक्षक)

२) मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय, काळभोरनगर

२/- सदर दंडात्मक कारवाईची नोटीस संबंधितांना बजावून पुर्तता अहवाल मुख्य कार्यालयास सादर करावा. संबधीतांच्या नजीकच्या वेतनातुन दंड कपात करणेत यावा.

प्रत,

१) मा.अतिरिक्त, आयुक्त सो.

मा. माहितीसाठी सादर